आर.सी.सी क्र.७९०/२०२५
सरकार विरुध्द. हर्षकुमार
निशाणी क्र.५५/क पुढे चालु...

दिनांक ०९.०३.२०२६ रोजी -

**अभियोग पक्षाचा साक्षीदार क्र.२ सौ. शितल शिंदे यांची पुढील सरतपासणी शपथेवर सुरु आरोपी पक्ष क्र.१ करीता विद्वान श्री. पी. एस. बर्जे, विधीज्ञ यांचे द्वारा..**

**१३.** मला सदर प्रकरणाची माहिती कोणी दिली त्यांचे नाव मी सांगु शकत नाही, कारण मला माहिती हि पोलीसांनी दिली. आमच्या कार्यालयात साधारण २० ते २५ लोक आतमध्ये काम करतात. आमच्या कार्यालयात काही लोक आतमध्ये काम करतात तर काही प्रत्यक्ष मैदानावर काम करतात जे कार्यालयात असतात. हे म्हणणे खरे आहे की, या सर्वाचा प्रत्यक्ष संजय सबनीस यांच्याशी संपर्क येतो. हे म्हणणे खरे आहे की, तेथे दोन विभाग आहेत, यामध्ये उपविभागीय क्रिडा व युवक कार्यालय व विभागीय क्रिडा संकुल समिती असे आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी सरतपासात नक्की कोणत्या विभागात नियुक्त आहे हे सांगितलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, सदर दोन्ही विभाग श्री. संजय सबनीस यांच्या अखत्यारीत येतात. उपसंचालक कार्यालयात ११ कर्मचारी काम करतात व विभागीय क्रिडा संकुल समितीमध्ये ०४ कर्मचारी काम करतात. हे मला माहिती नाही की, या प्रकरणाची माहिती समजल्यानंतर संजय सबनीस यांनी कर्मचा-यांनी बैठक घेतली अथवा नाही. आमच्या कार्यालयात महिला कर्मचारी ०२ आहेत. हे म्हणणे खरे आहे की, ०२ महिला कर्मचा-यांपैकी कोणी रजेवर असल्याचे माझे म्हणणे नाही. प्रस्तुत प्रकरणात झालेल्या पंचनाम्या वेळी महिला कर्मचारी यांना पंच म्हणुन कोणाला घ्यायचे हे कोणी सांगितले याबाबत मला काही माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, पंच म्हणुन कोणी काय करायचे हे आमच्या कार्यालयातील कोणी सांगितले नसुन हे पोलीसांनी सांगितलेले आहे. माझी पोलीसांबरोबर तपास कामासाठी प्रथमच भेट झालेली आहे. मला पोलीसांना एक नोटीस पाठवली, त्याव्यतिरिक्त काही नाही. सदर नोटीस दिनांक १७.०१.२०२५ रोजीची होती. हे म्हणणे खरे आहे की, सदर नोटीस मला कशी मिळाली, कधी मिळाली याबाबत मी काही सांगितलेले नाही. मला नोटीस मिळाल्यानंतर मी कार्यालयात कर्मचा-यांसोबत चर्चा केली होती. हे म्हणणे खरे

आहे की, ज्या कर्मचा–यांसोबत चर्चा केली त्यांचे नाव मी कुठेच सांगितलेले नाही व याबाबत मी आज पहिल्यांदाच सांगत आहे. सदर नोटीस मला दुपारी १२ ते ०२ च्या दरम्यान मिळाली असेल. हे म्हणणे खरे आहे की, साधारण नोटीस मिळाल्यानंतर दुपारी ०४.०० वाजेपर्यंत मी काय करायला पाहिजे ते ठरवले होते. हे म्हणणे खरे आहे की, दिनांक १७.०१.२०२५ रोजी कार्यालयात हजर होते त्याबाबत कोणताही पुरावा पोलीसांना हस्तगत केला नाही व मी देखील तसा पुरावा दिला नाही. हे म्हणणे खरे आहे की, कार्यालयातुन कोणत्याही कामासाठी बाहेर जायचे असल्यास वरिष्ठांची परवानगी लागते. माझे काम हे कार्यालयात बसुन करायचे आहे. हे म्हणणे खरे आहे की, आमच्या कार्यालयाचे वरिष्ठ हे संजय सबनीस आहे व त्यांचीच परवानगी बाहेर जाण्यासाठी घ्यावी लागते. मला दिनांक १७.०१.२०२५ रोजी प्राप्त झालेली नोटीस हि कार्यालयातच आली. हे म्हणणे खरे आहे की, कार्यालयात येणारा प्रत्येक कागद हा आवक नोंद होवुनच येतो. मला प्राप्त झालेल्या नोटीसला आवक क्रमांक नमुद नाही. मला नोटीस मिळाल्यानंतर ०४.३० वाजता पोलीस स्टेशनला जायचे ठरवले, त्यासाठी परवानगीसाठी श्री. संजय सबनीस यांच्याकडे गेले नाही. साक्षीदार स्वतःहुन सांगतात की, मी त्यादिवशी आमच्या कार्यालयात नव्हतेच, तर त्यादिवशी संपुर्ण वेळ पोलीस आयुक्त कार्यालयात होते. मी पोलीस आयुक्त कार्यालयात असतांना सदर नोटीस मला आमच्या कार्यालयातील कोणत्या कर्मचा–याने आणुन दिली त्याचे नाव मला आठवत नाही. हे म्हणणे खरे आहे की, सदर नोटीस मला आमच्याच कार्यालयातील मला आणुन दिलेली आहे. मी आता उलटतपासात जे सांगितले की, मी आमच्या कार्यालयात नोटीस मिळाल्यानंतर कर्मचा–यांशी चर्चा केली व काय करायचे ते ठरवले तसेच मी सकाळपासुन दिवसभर पोलीस आयुक्त कार्यालयात होते यापैकी पोलीस आयुक्त कार्यालयात सकाळपासुन दिवसभर होते हेच म्हणणे खरे आहे. मी पोलीस आयुक्त कार्यालयात हजर होते हे मला आमचे मुख्य लिपीक श्री. जगदाळे यांनी सांगितले होते. श्री. जगदाळे यांनी मला प्रत्यक्ष भेटुन पोलीस आयुक्त कार्यालयात हजर राहणेबाबत सांगितले. मी पोलीस आयुक्त कार्यालयात असतांना श्री. जगदाळे यांनी मला पुन्हा पोलीस आयुक्त कार्यालयात हजर रहा असे सांगण्याची आवश्यकता नव्हती. आमचे सर्व कार्यालयीन कर्मचारी हे पोलीस आयुक्त कार्यालयातच हजर होते. पोलीस आयुक्त कार्यालयात हजर राहणेबाबत आम्हाला श्री. तेजय कुलकर्णी, क्रिडा अधिकारी यांनी

सांगितले होते. हे म्हणणे खरे नाही की, आमच्या कार्यालयात तेजस कुलकर्णी नोकरीलाच नाही. संजय सबनीस हे उपसंचालक व त्यांची त्यादिवशी पोलीस आयुक्त कार्यालयात सर्वांनी हजर रहावे अशी तोंडी परवानगी मिळाली असेल, पण मी स्वतः तशी परवानगी ऐकली नाही. हे म्हणणे खरे आहे की, आमच्या सर्व कर्मचा–यांची पोलीस आयुक्त कार्यालयात आपण काय–काय करायचे आहे ती चर्चा झाली होती. पोलीस आयुक्त कार्यालयात कोणी काय करावे हे ठरविण्यासाठी कोणी निर्देशित केले हे मला सांगता येणार नाही. दिनेश मिसाळ, दुसरे पंच हे देखील पोलीस आयुक्त कार्यालयात हजर होते. पोलीस आयुक्त कार्यालयात संजय सबनीस हे आले किंवा नाही याबाबत मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, संजय सबनीस हे पोलीस आयुक्त कार्यालयात त्यादिवशी मात्र आले होते. पोलीस आयुक्त कार्यालयात मला पोलीसांनी कशा–कशावर माझ्या सहया लागणार आहेत ते सांगितले होते. ज्या पोलीसांने मला सदर घटना सांगितली होती, त्यांचे नाव अशोक अवचार, पो.उप.नि. असे होते. हे म्हणणे खरे आहे की, पो.उप.नि. अशोक अवचार यांनी सांगितल्याप्रमाणे मी त्यांच्यावर विश्वास ठेवुन मी जे काही ऐकले ते सर्व सांगितले.

**१४.** आरोपी क्र.१ याचे हस्ताक्षर मी ओळखते असे माझे म्हणणे नाही व त्याचे हस्ताक्षर ओळखण्याचा प्रश्नच माझ्याकडे आलेला नाही. नि.क्र.७२ आवक–जावक रजिस्टर व नि.क्र.७३ त्यातील प्रत्यक्ष अ.क्र.३५८ ची नोंद मला दाखवली. माझे असे म्हणणे नाही की, नि.क्र.७२ रजिस्टरमध्ये व नि.क्र.७३ नोंदवर आरोपीचे हस्ताक्षर आहे किंवा त्याने काही लिहिले आहे. हे म्हणणे खरे आहे की, न्यायालयात जे काही कागद आहेत त्यामध्ये आरोपी क्र.१ चे कुठे हस्ताक्षर आहे व त्याबाबत माझे काही म्हणणे नाही.

**१५.** हे म्हणणे खरे आहे की, मला पोलीसांकडुन एकदाच नोटीस दिनांक १७.०१.२०२५ ची आली त्यानंतर कोणतीही नोटीस पोलीसांकडुन मिळालेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, मला पोलीसांनी कोणत्या पंचनाम्यावर कधी सहया करायच्या आहेत हे मला माहिती असल्याचा प्रश्नच नव्हता. प्रस्तुत प्रकरणात झालेल्या पंचनाम्यात काय चतुर्सिमा लिहिल्या हे मला माहिती असल्याचे कारणच नाही. हे म्हणणे खरे आहे की, जे काही पंचनामे झाले त्यामध्ये कोणी व काय लिहिले हे मला व्यक्तीश सांगता येणार नाही. मलाच पंचनाम्यासाठी का बोलवत आहे याबाबत मी संजय सबनीस व

पोलीसांकडे विचारणा केली नाही. माझे असे म्हणणेच नाही की, ज्या वेळी पंचनामे झाले त्यावेळी त्याठिकाणी बरेच लोक हजर होते.

**१६.** साधारण भिंतीवरील ए.सी. काढायला एक ते दोन तास लागतात, मी पंचनाम्यासाठी गेले त्यावेळी ए.सी. हे भिंतीवरच होते, ते काढुन ठेवलेले नव्हते. मी त्या ए.सी. चा सिरीअल क्रमांक पाहिला नाही अथवा भिंतीवर चढुन सिरीअल क्रमांक पाहिलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, प्रस्तुत प्रकरणातील पंचनामे तयार होण्यासाठी किती वेळ लागला हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, नि.क्र.१९५ पंचनाम्यामध्ये नमुद ज्या काही वस्तु जप्त झालेल्या आहेत त्या वस्तुंचा सविस्तर तपशिल ज्यामध्ये सिरीअल क्रमांक, तयार झालेली तारीख, कोणी बनवले, कुठे बनवले, व अन्य बाबी हे पाहण्याचा मला प्रश्नच आला नाही. हे म्हणणे खरे आहे की, नि.क्र.१९५ जप्त झालेल्या वस्तु कोणाच्या मालकीच्या आहेत, त्या वस्तुंची बिले, तसेच ते कोणत्या दुकानातुन कोणी विकत घेतली या विषयीची कागदपत्रे मी आजअखेर पाहिलेली नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांनी मला ज्याठिकाणी सही करण्यास सांगितले त्याठिकाणी मी सही केलेली आहे. माझे असे म्हणणे नाही की, मी केलेल्या पंचनाम्याच्या वेळेला ईतर दुसरा पंच हजर नव्हता, साक्षीदार सांगते की, माझ्या एका पंचनाम्याच्या वेळेला एक पंच हजर होता, बाकी पंचनाम्यावेळी हजर नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, पंचनाम्यावर सहया नक्की कोठे झाल्या व किती तारखेला झाल्या हे मला सांगता येणार नाही. जेथे मी सहया केल्या त्यावेळी लॅपटॉप सोबत आणलेला होता. सदर लॅपटॉप हा पोलीस आयुक्त कार्यालयात दाखविण्यात आलेला नाही. सदर लॅपटॉप हा कोणाच्या मालकीचा होता याबाबत मला काही माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, त्या लॅपटॉप मध्ये कोणी काही टंकलिखीत केले होते त्याबाबतही मला काही सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी कोणतेही पंचनामे केले नाहीत.

**(मध्यांन्हाची वेळ झाल्याने पुढील उलटतपास तहकुब.)**

समक्ष

RAGHUNATH SHRIDHAR JAMBOTKAR Digitally signed by RAGHUNATH SHRIDHAR JAMBOTKAR Date: 2026.03.09 17:26:16 +0530

( श्री. आर. एस. जांबोटकर )

मुख्य न्यायदंडाधिकारी, औरंगाबाद

श्रवणोत्तर स्वीकृती.

RAGHUNATH SHRIDHAR JAMBOTKAR Digitally signed by RAGHUNATH SHRIDHAR JAMBOTKAR Date: 2026.03.09 17:26:21 +0530

( श्री. आर. एस. जांबोटकर )

मुख्य न्यायदंडाधिकारी, औरंगाबाद

दिनांक– ०९/०३/२०२६

**<u>अभियोग पक्षाचा साक्षीदार क्र.२ सौ. शितल शिंदे यांची पुढील उलटतपासणी शपथेवर सुरु, आरोपी पक्ष क्र.१ करीता विद्वान श्री. पी. एस. बर्जे, विधीज्ञ यांचे द्वारा..</u>**

**१७.** हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र.१ याच्या नावाचा करारनामा, पावती व ईतर जप्त आर्टीकल क्र.९ ते ११ या कागदपत्रांच्या बाबत सविस्तर मला काहीही माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, या कागदपत्रांच्या बाबत मला सविस्तर काही माहिती नसल्यामुळे ते कागदपत्रे खरे की खोटे ते मी सांगु शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक १७.०१.२०२५ रोजी पुर्वी मला पोलीसांना भेटण्याचा योग आला नाही. दिनांक १७.०१.२०२५ रोजी पुर्वी मी पोलीसांना भेटले याबाबत मी माझ्या सरतपासात काहीही कथन केलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, ड्रिम होम अय्यापा मंदिर जवळ सदनिका क्र.बी–९ हि कागदोपत्री कोणाच्या मालकीची आहे याबाबत मी काहीही कागद पाहिलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, सदरील सदनिकाचा मालकीचा कागद न पाहिल्यामुळे मी वैयक्तीकरित्या सदनिकेच्या मालकीविषयी मी काही बोलु शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी सदरील सदनिका व या प्रकरणातील आरोपी क्र.१ च्या संबंधित कागदपत्रांबाबत मी स्वतः काही खातरजमा केलेली नसल्यामुळे मी त्याच्या बाबत काही भाष्य करु शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, नि.क्र.१९५ मधील जप्त मुद्देमाल म्हणजे १४ नोंदी ज्या दाखवलेल्या आहेत त्याची खातरजमा मी केलेली नसल्यामुळे त्याबाबत मी काही वैयक्तीक बोलु शकत नाही.

**१८.** हे म्हणणे खरे आहे की, माझे असे म्हणणेच नाही की, कोणत्याही पंचनाम्यावेळी आमच्या सोबत फोटोग्राफर होते. हे म्हणणे खरे आहे की, आर्टीकल बी–१ ते बी–१८ हे फोटो कोणी काढले याबाबत मी काही सांगु शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, आर्टीकल बी–१ ते बी–१८ हे कोणाचे आहे याच्या सत्यतेविषयी मी काही कथन करु शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रस्तुत प्रकरणातील पंचनामा करतेवेळी मी अधिकृतरित्या कर्तव्यावर हजर नव्हते. साक्षीदार स्वतःहुन सांगते की, पहिल्या पंचनाम्यावेळी मी कार्यालयात अधिकृतपणे होते, तर ईतर पंचनाम्यावेळी नव्हते. मी पहिल्या पंचनाम्यावेळी कार्यालयात अधिकृतपणे हजर होते तसा पोलीसांनी काही कागद जप्त केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या सरतपासात मी पंचनाम्यावेळी किती वाजता हजर रहा व कोणी हजर रहावे व सहया कुठे कराव्यात हे कोणी सांगितले असे सांगितलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, प्रस्तुत प्रकरणात आमच्या कार्यालयातील

कर्मचा–यां व्यतिरिक्त ईतर बाहेरचे पंच शोधलेले नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र.१ च्या ताब्यातुन नि.क्र.१९५ मधील जप्त मुद्देमाल हा आरोपी क्र.१ च्या ताब्यातुन जप्त केला असे माझे म्हणणे नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र.५, ६ व ७ यांच्या ताब्यातुन नि.क्र.१९५ मधील जप्त मुद्देमाल हा आरोपी क्र.५ ,६ व ७ यांच्या ताब्यातुन जप्त केला असे माझे म्हणणे नाही.

**१९.** हे म्हणणे खरे आहे की, आमच्या कार्यालयाचे प्रमुख हे संजय सबनीस असल्यामुळे माझे रजा, पगार व ईतर सुट्टया हे सर्व त्यांच्या आदेशानेच होत असतात. हे म्हणणे खरे आहे की, संजय सबनीस हे आमचे प्रमुख असल्यामुळे त्यांचा आदेश/म्हणणे आम्हाला पाळावे लागते.

**२०.** हे म्हणणे खरे आहे की, माझ्या सरतपासात कथन केल्याप्रमाणे संगणक, प्रिंटर, व ईतर गोष्टी ज्यामध्ये कॅश रजिस्टर, जावक आवक रजिस्टर हया तेजस कुलकर्णी यांच्या ताब्यात असते असे माझे म्हणणे नाही. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांना जर त्या गोष्टी ताब्यात घ्यायचा असतील तर त्या वस्तु ज्यांच्या ताब्यात आहेत त्यांच्या ताब्यातुनच घ्याव्या लागतात. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांनी सदर गोष्टीचे काय केले याबाबात मला काही माहिती नाही कारण त्याबाबत माझा काही संबंध नाही. हे म्हणणे खरे आहे की, सदर गोष्टीबाबत म्हणजे आर्टीकल अ–१२, अ–१३ व ईतर कॅश बुक रजिस्टर, आवक जावक रजिस्टर व ईतर गोष्टींबाबत मी सविस्तर काही सांगु शकत नाही तसेच त्याच्या सत्यतेबाबत देखील काही सांगु शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, सदर गोष्टींची माझा काही संबंध नसल्यामुळे त्यामधील डेटा/माहिती बाबत देखील मला काही माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, कार्यालयात घडलेल्या प्रकरणाविषयी समजल्यानंतर मला आरोपी क्र.१ बाबत चिड आली. साक्षीदार स्वतःहुन सांगते की, मला धक्का बसला व आश्चर्य वाटले. हे म्हणणे खरे नाही की, मला सबनीस यांच्याकडुन मला सदर प्रकरणा बाबत बरीच माहिती मिळाली. हे म्हणणे खरे आहे की, जगदाळे यांच्याकडुन मला या प्रकरणाबाबत बरीच माहिती मिळाली. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या सरतपासात आरोपी क्र.१ बाबत झालेल्या आरोपांबाबत मी वैयक्तीक शहानिशा केलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, प्रस्तुत प्रकरण हे खुप मोठे असल्यामुळे आमच्या कार्यालयातील सर्वांवर व माझ्यावर देखील दबाव आहे. हे म्हणणे खरे नाही की, संजय सबनीस यांच्या सांगण्यावरुन सर्व कागदपत्रांवर व तयार पंचनाम्यावर माझ्या

सहया घेण्यात आलेल्या आहेत. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र.१ याला खोटया प्रकरणात अडकविण्यासाठी मी पोलीसांच्या सांगण्यावरुन साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे आहे की, दिनांक १७.०१.२०२५ रोजी आमच्या कार्यालयातील सर्व कर्मचारी असे पोलीस आयुक्त कार्यालयात हजर होतो हे पहिल्यांदाच न्यायालयात सांगत आहे. आम्ही पोलीस आयुक्त कार्यालयात किती वाजच्यापासुन ते किती वाजेपर्यंत हजर होतो व तेथे काय केले हे मी पुराव्यात सांगितलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, कार्यालयाचा दबाव असल्यामुळे खोटा व बनावट पंचनाम्यासाठी सहया केलेल्या आहेत व कार्यालयातील लोकांच्या दबावामुळे शिकवलेली साक्ष देत आहे.

**आरोपी क्र.१ तर्फे उलटतपास संपला.**

**(ईतर आरोपींकरिता उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब.)**

समक्ष

RAGHUNATH SHRIDHAR JAMBOTKAR
Digitally signed by RAGHUNATH SHRIDHAR JAMBOTKAR
Date: 2026.03.09 17:26:28 +0530

( श्री. आर. एस. जांबोटकर )

मुख्य न्यायदंडाधिकारी, औरंगाबाद

श्रवणोत्तर स्वीकृती.

RAGHUNATH SHRIDHAR JAMBOTKAR
Digitally signed by RAGHUNATH SHRIDHAR JAMBOTKAR
Date: 2026.03.09 17:26:32 +0530

( श्री. आर. एस. जांबोटकर )

मुख्य न्यायदंडाधिकारी, औरंगाबाद

दिनांक– ०९/०३/२०२६.